## ज्योतिषविषयक

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



DIRECT ADMISSION

MBBS | MD | MS | BDS | MDS

BAMS | BUMS | BHMS

PANCHAKARMA

DERMATOLOGY | NURSING

PHARMACY

PHYSIOTHERAPY

PARAMEDICAL | VETERINARY

OPHTHALMOLOGY | FMGE

Indo Abroad Education

9326134770



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १७४ वा | बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# अजितदादांचा अपघात नाही घातपातच- आ. रोहित पवार

**मुंबई (कटूसत्य वृत्त):** अजितदादा पवार यांच्या विमानाचा अपघात नव्हे तर घातपात झाला आहे, अशी आम्हाला दाट शंका वाटते. विमान अपघाताची चौकशी सीआयडीद्वारे न करता डीजीसीएसह परदेशातील अनुभवी संस्थांकडून करावी. विमान कंपनीला युरोपात हवाई वाहतूक करण्यास बंदी घातलेली असताना भारतात परवानगी कशी दिली गेली.

वैमानिक व्यसनी होता का? असे विविध प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) प्रदेश सरचिटणीस आमदार रोहित पवार यांनी उपस्थितीत केले.

अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याच्या घटनेला तेरा दिवस उलटल्यानंतर रोहित पवार यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन सविस्तरपणे आपल्या शंका, आक्षेप उपस्थित केले.



सर्व घटनाक्रम आणि त्यातील त्रुटी निदर्शनास आणून त्यांनी हा अपघात नव्हे तर घातपात असल्याचा गंभीर आरोप केला.

अजित पवार यांचा विमान प्रवास ऐनवेळी ठरविण्यात आला. नियोजित वैमानिक न येता अन्य वैमानिकांनी विमान उडविले. पहिल्यांदा बारामती विमानतळावर दृशमानता चांगली होती, ती नंतर कमी कशी झाली. वैमानिक सुमित कपूर यांना दारूचे व्यसन होते. त्यामुळे अनेकदा त्यांच्यावर कारवाई झाली होती, निलंबितही केले होते. तरीही व्हीएसआर कंपनीने त्यांना पुन्हा वैमानिक म्हणून का नेमले. त्यांची मानसिक स्थिती काय होती.

व्हीएसआर कंपनीचे लियरजेट ४५ हे विमान सोळा वर्षे जुने होते. इतके जुने विमान हवाई वाहतुकीसाठी योग्य होते का. मुंबईत २०२३ मध्ये याच कंपनीच्या एका विमानाचा अपघात झाला होता. त्या बाबतचा अहवाल अद्याप जाहीर करण्यात आला नाही. अपघातानंतर युरोपीय संघ विमान वाहतूक सुरक्षा एजन्सीने (ईएएसए) अपघाताचा अहवाल मागितला होता. तो अहवाल दिला नाही म्हणून ईएएसएकडून कंपनीला युरोपात हवाई वाहतूक करण्यास बंदी घातली होती.

व्हीएसआरचा परवाना निलंबित करण्यात आला होता. त्यानंतरही भारतात कंपनीला हवाई वाहतुकीची परवानगी कशी देण्यात आली. याच कंपनीकडून राज्यासह देशातील अनेक मुख्यमंत्री आणि राजकीय नेत्यांना विमाने पुरविली जातात. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने विमान कंपनीची चौकशी करावी. त्यांच्याकडील विमानाची दुरुस्तीचे काम कसे केले जाते. ते कोणाच्या मार्गदर्शनाखाली होते, याची चौकशी करण्याची गरज आहे, असेही पवार म्हणाले.

## अनुभवी संस्थांकडून चौकशी व्हावी



विमान अपघाताची चौकशी सीआयडी आणि डीजीसीएच्या माध्यमातून चौकशी सुरू आहे. आमचा या संस्थांवर विश्वास आहे. पण, सीआयडीला अशा प्रकारच्या घटनांची चौकशी करण्याचा अनुभव नाही. त्यांचे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. त्यांना विमानतळावर प्रवेश करण्याचाही अधिकार नाही. डीजीसीएसह फ्रान्सच्या नागरी विमान वाहतूक सुरक्षा तपासणी आणि विश्लेषण ब्युरो (बीईए) आणि ब्रिटनच्या विमान अपघात तपासणी शाखेकडून (एआयबी) चौकशी केली जावी. अपघातग्रस्त विमानाच्या ब्लॅक बॉक्सचे पूर्ण रेकॉर्डिंग कुटुंबातील किमान एका व्यक्तीला मिळाले पाहिजे. विमानाच्या कॉकपीटमधील संवाद पूर्णपणे उपलब्ध करून द्यावा. सध्या उपलब्ध असलेला संवाद सहवैमानिक कॅप्टन शांभवी पाठक आणि बारामती एटीसीच्या अधिकाऱ्यांमधील आहे. मुख्य वैमानिक कॅप्टन सुमित कपूर यांचा सवांद समोर आला नाही. त्यामुळे त्यांची नेमकी स्थिती समोर यावी. विमान उतरविण्यासाठी बारामती विमानतळावरील २९ क्रमांकाची धावपट्टी सुरक्षित असतानाही ११ क्रमाकांच्या काहीशा धोकादायक धावपट्टीचा आग्रह का धरण्यात आला, असा प्रश्नही पवार यांनी उपस्थित केला. अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर अनेक प्रश्न आम्हाला पडले, शंका निर्माण झाल्या. पण, अजित पवार गटाच्या वरिष्ठ नेत्यांना अशा शंका, संशय निर्माण झाला नाही. त्यांनी सत्ता जास्त महत्त्वाची वाटत होती. सत्तेत राहण्यासाठी त्यांची धडपड सुरू होती. त्यामुळे सुनेत्रा पवार यांची इच्छा नसतानाही त्यांना लगेचच शपथ घ्यायला लावली. त्यांना सत्ता जास्त महत्त्वाची वाटत असावी, अशी टिकाही त्यांनी नाव न घेता केली.

### रोहित पवार यांनी उपस्थित केलेले प्रश्न

- १६ वर्षे जुने विमान अद्याप हवाई वाहतूक सेवेत कसे होते.
- विमान उड्डाण करण्याच्या स्थितीत होते का. त्याची तपासणी कुणी केली.
- युरोपात बंदी असताना देशात वाहतुकीला परवानगी कशी दिली गेली.
- अपघाताग्रस्त विमानाची देखभाल - दुरुस्ती कुठे केली जात होती.
- विमानात हवाई इंधन भरलेले कॅन होते का.
- विमानाची स्थिती सांगणारे ट्रान्सपॉन्डर बंद का होते.
- फॉरेन्सिकची टीम घटनास्थळी उशिराने का आली.

# ‘माझा शिवबा’ लेखन स्पर्धेचे आयोजन

## चंद्रनील सोशल फाउंडेशनचा समाजप्रबोधनात्मक उपक्रम

### सी.ए. सुशील बंदपट्टे यांच्या संकल्पनेतून







**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** छत्रपती शिवाजी महाराज यांना केवळ डोक्यावर घेण्याऐवजी डोक्यात घ्यावे, त्यांच्या विचारांतून आणि कायार्तून नव्या पिढीला घडवावे, या मूलभूत उद्देशाने चंद्रनील सोशल फाउंडेशनच्या वतीने ‘माझा शिवबा’ या भव्य लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा आणि युवक-युवतींमध्ये शिवरायांचे विचार रुजावेत, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात येत असून, ही संकल्पना सी. ए. सुशील बंदपट्टे यांची आहे.

‘एकच ध्यास... समाजाचा विकास!’ या ब्रीदवाक्याअंतर्गत ही लेखन स्पर्धा प्रत्येक परिवारासाठी आणि परिवारातील प्रत्येक घटकासाठी खुली ठेवण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती नाचून नव्हे, तर वाचून आणि विचार करून साजरी व्हावी, असा स्पष्ट संदेश या स्पर्धेच्या माध्यमातून देण्यात येत आहे.

या स्पर्धेसाठी पहिला गट - इयत्ता ५ वी, ६ वी व ७ वी, दुसरा गट - इयत्ता ८ वी, ९ वी व १० वी, खुला गट - १० वी पुढील सर्व वयोगटांसाठी खुला असे तीन गट निश्चित करण्यात आले आहेत.

स्पर्धकांसाठी 1. शिवाजी महाराजांचे बालपण, 2. स्त्री सन्मान व शिवराय, 3. शिवाजी महाराज आता असते तर... हे तीन विषय देण्यात आले आहेत.

गटनिहाय शब्दमर्यादा निश्चित करण्यात आली असून, पहिल्या गटासाठी ३०० ते ४०० शब्द, दुसऱ्या गटासाठी ४०० ते ६०० शब्द, तर खुल्या गटासाठी ७०० ते १००० शब्द इतकी शब्दमर्यादा ठेवण्यात आली आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व आकर्षक रोख बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे. पहिल्या व दुसऱ्या गटासाठी प्रथम येणाऱ्या १० क्रमांकांना प्रत्येकी ₹२५००, द्वितीय २० क्रमांकांना ₹१५००, तर तृतीय ३० क्रमांकांना ₹१००० रोख बक्षीस देण्यात येणार आहे.

खुल्या गटासाठी प्रथम क्रमांकास ₹११,०००, द्वितीय ₹७,००० व तृतीय ₹५,००० अशी रोख बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत.

स्पर्धेत सहभाग पूर्णतः मोफत असून, लेख मराठी (पान 2 वर..)

# महापौरपदासाठी मराठ्यांना जाणीवपूर्वक डावलणाऱ्या मराठा द्वेषी प्रवृत्तीला जिल्हा परिषद निकालात दिले उत्तर - राम भैय्या जाधव (मराठा आंदोलक)

## ६८ पैकी ५५ पेक्षा अधिक जागा जिंकण्याचे भाजपचे स्वप्न

## केवळ ३८ जागांवर समाधान; ३० उमेदवार भाजपच्या विरोधात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** सोलापूर महापालिकेच्या महापौरपदी मराठा समाजाच्या व्यक्तीची जाणीवपूर्वक निवड न करता भाजपने समाजावर अन्याय केला, असा गंभीर आरोप मराठा आंदोलक व मराठा क्रांती मोचार्चे राज्य समन्वयक राम भैय्या जाधव यांनी केला आहे. ‘एक मराठा, लाख मराठा’ असा ठाम इशारा देत त्यांनी भाजपच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

राम भैय्या जाधव यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्हा परिषद निवडणुकीत ६८ पैकी ५५ पेक्षा अधिक जागा जिंकण्याचे स्वप्न भाजपने पाहिले होते. मात्र, प्रत्यक्षात भाजपला केवळ ३८ जागांवर समाधान मानावे लागले, तर भाजपच्या विरोधात ३० उमेदवार निवडून आले. हा निकाल म्हणजे सोलापूर शहरातील काही मराठा द्वेषी भाजप नेत्यांना जनतेने दिलेले चोख उत्तर असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

जाधव यांनी आरोप केला की, सोलापूर शहरातील भाजपच्या काही प्रमुख नेत्यांनी जाणीवपूर्वक मराठा समाजाचा महापौर होऊ दिला नाही. १९९३ नंतर तब्बल ३२ वर्षे मराठा समाजाला सोलापूर महापालिकेच्या महापौरपदापासून वंचित ठेवण्यात आले असून, यंदा तीन दशकांनंतर ही संधी भाजपकडे असतानाही ती मुद्दाम हिरावून घेतली गेली, असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.







‘महापौरपदावर मराठा समाजाला डावलण्याची भूमिका ही अपघाती नसून, ती नियोजनबद्ध आहे. त्यामुळेच जिल्हा परिषद निवडणुकीचा निकाल हा भाजपच्या या अन्यायकारक धोरणाविरोधातील जनतेचा स्पष्ट कौल आहे,’ असेही जाधव यांनी नमूद केले.

तसेच त्यांनी स्पष्ट इशारा देताना म्हटले की, ‘भाजप असो वा काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना किंवा इतर कोणताही राजकीय पक्ष जर शैक्षणिक, राजकीय, नोकरी किंवा सामाजिक क्षेत्रात मराठा समाजावर अन्याय झाला, तर मराठा समाज शांत बसणार नाही. त्या अन्यायाविरोधात संघटितपणे आणि सातत्याने आवाज उठवला जाईल.’

दरम्यान, भाजपविरोधात निवडून आलेल्या ६८ पैकी ३० उमेदवारांचे, तसेच भाजपमधून निवडून आलेल्या मराठा समाजातील उमेदवारांचे राम भैय्या जाधव यांनी अभिनंदन केले आहे. हा निकाल मराठा समाजाच्या जागृतीचे आणि अन्यायाविरोधातील लढ्याचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले.

या वक्तव्यामुळे सोलापूरच्या राजकारणात नव्या वादाला तोंड फुटले असून, महापौर निवडीच्या पार्श्वभूमीवर मराठा समाजाचा असंतोष उघडपणे समोर आला आहे. या आरोपांवर भाजपकडून काय भूमिका मांडली जाते, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.




सोलापूर जिल्ह्याचे भाग्यविधाते
सहकार महर्षि कै.शंकरराव
नारायणराव मोहिते-पाटील
यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन !





ADMISSION OPEN

**SHANKARRAO MOHITE - PATIL ENGLISH SCHOOL & JR. COLLEGE, AKLUJ**
(Std.1-12 classes - CBSE & Maharashtra state board syllabus)
Ph. 9172196213
Email - smpesakluj@gmail.com

**VIJAYSINH MOHITE - PATIL COLLEGE OF NURSING & MEDICAL RESEARCH INSTITUTE, AKLUJ**
(M.Sc. Nursing, Basic B.Sc. Nursing, R.G.N.M. & R.A.N.M., - Affiliated to I.N.C. New Delhi, M.N.C. Mumbai & M.U.H.S., Nashik)
Ph. (02185) - 226752 * Email - akluj_nursing@rediffmail.com

**SHIVRATNA C.B.S.E. SCHOOL, AKLUJ**
1-10 classes (Affiliated to CBSE )
Ph. 9172196213
Email - shivratnaschool79@gmail.com

**SHIVRATNA INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES, AKLUJ**
(B.B.A. - Affiliated to Solapur University, M.B.A., M.Com. - YCMOU, Nashik Study Center , Naac Grade : B++ )
Ph. (02185) - 222509 * Email - rmpakluj@gmail.com

**FREE WINGS PRE-PRIMARY SCHOOL, AKLUJ**
Ph. 9172196213
Email - smpesakluj@gmail.com

**SHIVRATNA GIRL'S HOSTEL, SHANKARNAGAR-AKLUJ**
Ph. 9604695339 * Email - shivratnagirlhostel@gmail.com

**SHIVRATNA MILLENNIUM SCHOOL, AKLUJ**
Ph. 8793411005

**TARARANI WOMEN'S WRESTLING ACADEMY, AKLUJ**
**SHIVRATNA BOY'S WRESTLING ACADEMY, AKLUJ**
Mob.7387311005 * Email - twwa.akluj@gmail.com

**SHIVRATNA SEMI ENGLISH SCHOOL, AKLUJ**
(Pre-Primary & Std. 1 to 6, S.S.C. Board)
Ph. (02185) - 227552 / 222552
Email - smpsemienglishakluj@gmail.com

**SHIVRATNA BOYS HOSTEL, AKLUJ**
Ph. (02185) 224952
Email - shivratnashikshansanstha@gmail.com

**SHIVRATNA PATTERN, AKLUJ**
NEET / JEE / MH- CET Coaching Center
Mob.8956993001 / 7517827801
Email - shivratnapatternakluj@gmail.com

**SHIVRATNA SPORTS ACADEMY, SHANKARNAGAR-AKLUJ** * Ph. 80875 41009

Trustee, Teaching, Non-Teaching Staff & Students

**SHIVRATNA SHIKSHAN SANSTHA**

SHIVRATNA KNOWLEDGE CITY, SHIVAMRUT ROAD, SHANKARNAGAR-AKLUJ TAL.MALSHIRAS DIST.SOLAPUR (MS)
Phone : (02185) 224952 / 227552 ■ Email - shivratnashikshansanstha@gmail.com ■ Web : www.sssakluj.org
■ ADMISSIONS ARE OPEN FOR THE ACADEMIC YEAR 2025-2026
■ KINDLY CONTACT TO THE RESPECTIVE BRANCHES IMMEDIATELY & CONFIRM YOUR ADMISSION

# ठाकरेंचा भागवतांवर संताप:

## 'आपण ठासून कधी बोलणार?




**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी कार्यक्रमात सरसंघचालक मोहन भागवत यांनी भाषेबद्दल आग्रही राहणे आणि त्यासाठी आंदोलन करणे हा 'आजार' असल्याचे विधान केल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरें यांनी संघावर जोरदार टीका केली आहे. त्यांनी या विधानाला 'भाषिक अस्मितेला अपमान' म्हणून पाहिले असून, संघाने या विषयावर स्पष्ट स्पष्टीकरण द्यावे, असा इशारा दिला आहे.

राज ठाकरेंनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, ८ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईत झालेल्या विशेष कार्यक्रमात भागवतांनी भाषेवरील प्रेमाला आजार म्हणून संबोधले. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. मात्र राज ठाकरेंचा आरोप आहे की, 'ही मंडळी संघाच्या प्रेमासाठी नाही, तर मोदी सरकारच्या दबावामुळे उपस्थित होती. त्यामुळे तुमच्या बाजूने ही उपस्थिती मान्य करणे चुकीचे आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले.

राज ठाकरेंनी भाषिक आणि प्रांतिक अस्मितेचा इतिहास संघाला माहित असावा, असा दावा करत प्रश्न उपस्थित केला की, देशातील अनेक राज्यांत (कर्नाटक, तमिळनाडू, पश्चिम बंगाल, पंजाब, गुजरात इ.) भाषिक अस्मिता आणि स्थानिक संस्कृतीच्या रक्षणासाठी रोष निर्माण झाला आहे. 'तिथे स्थानिक लोकांवर होणाऱ्या तणावांवर संघाने का आवाज उठवला नाही?' असा थेट सवाल त्यांनी केला.

त्याचबरोबर, राज ठाकरेंने गुजरातमध्ये उत्तर प्रदेश आणि बिहारहून आलेल्या लोकांवर होणाऱ्या सामाजिक संघर्षावर संघाने समरसतेचे धडे का नाही दिले, असा टोला लगावला. त्यांच्या मते, 'भाषिक अस्मिता हा आजार असल्यास तो गुजरातसारख्या राज्यांतही आहे,' असे त्यांनी नमूद केले.

राज ठाकरेंनी मराठी समाजाची सहनशीलता आणि सत्ताधाऱ्यांची 'लिबलिबित' वृत्ती याकडे लक्ष वेधले.

त्यांनी दावा केला की, काही महिन्यांपूर्वी भाजपचे नेते भय्याजी जोशी यांनी मुंबईची भाषा केवळ मराठीच नाही तर गुजरातीही आहे, असे विधान केले. त्यावरून मराठी माणसाला चिडवण्याचा प्रयत्न झाला, असा आरोप त्यांनी केला. 'अशा परिस्थितीत संघाने या वादात का पडावे?' असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

राज ठाकरेंनी संघाच्या कामाबद्दल आदर असल्याचे सांगितले, परंतु संघाने अप्रत्यक्षपणे राजकीय भूमिका घेण्याची भानगड टाळावी, असेही त्यांनी सांगितले. 'जर संघाला भाषिक समरसतेचे धडे शिकवायचे असतील, तर हिंदी लादणाऱ्या सरकारविरुद्ध आवाज उठवून दाखवा,' असा इशारा राज ठाकरेंने दिला.

तसेच, हिंदूंवर हल्ले होत असतील तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना हिंदू म्हणून भूमिका घेण्यास तयार असल्याचे ठाकरेंनी सांगितले. 'रझा अकादमीच्या दंगलीविरोधात मोर्चा काढणे, मशिदींवरील भोंग्यांच्या विरोधात आंदोलन करणे, तसेच हिंदू सणांच्या वेळी लाऊडस्पीकर/डिजेविरुद्ध भूमिका घेणे हे सर्व आमचे कार्य आहे,' असे त्यांनी अधोरेखित केले.

राज ठाकरेंनी उत्तर भारतातील कावड यात्रांमध्ये महिलांच्या अपमानास्पद वर्तन, गोहत्या राजकारण, आणि देशातील बीफ निर्यातीसंदर्भातील चर्चांवर संघाने आवाज उठवला पाहिजे, असा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. 'महाराष्ट्रात मराठी भाषा आणि मराठी माणूस हा अंतिम सर्वोच्च प्राधान्य आहे,' असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, 'सामना'च्या अग्रलेखातून उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेनेही संघावर टीका केली आहे. अग्रलेखात संघ आणि भाजप वेगळे असल्याच्या मुद्यावरून संघाला निशाणा साधण्यात आला आहे.

# जबरी चोरी करणारे आरोपी अकलूज पोलीस जाळ्यात

## 'गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सर्वस्तरातून कौतुक'

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलुज पोलीस स्टेशनकडील, गुन्हे प्रकटीकरण पथकाने, चार दिवसात जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणून, आरोपींना जेरबंद केले.




अकलूज पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार,

दिनांक ०४ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ०९.३० वाचे सुमारास, फियार्दी व त्यांचा भावा असे दोघेजण मोटार सायकल वरुन, न्यु सुजित गार्डन हॉटेल येथुन जेवन करुन घरी जात असताना, तांबोळी वसाहत अकलुज रोडने तीन अनोळखी इसमानी तोंडाला मास्क लावलेले, फियार्दी समोर गाडी आडवी लावुन, शिवीगाळी करुन, झटापटी करून, फियार्दीच्या गळ्यातील चैन, व उजव्या हातातील सोन्याचे ब्रेसलेट आणि डाव्या हातातील एक अंगठी दमदाटी करुन जबरदस्तीने काढुन घेवुन, फियार्दीस धक्का देवुन, युनिकॉर्न गाडीवर बसुन निघुन गेले.

तीन तोळे वजनाची सोन्याची चैन, तीन तोळे वजनाची सोन्याचे ब्रेसलेट, एक साडे चार ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, असा अंदाजे ३,२२,५००/-रु किंमतीचे ६.४ तोळे वजनाचे सोन्याचे दागिणे चोरी केले होते. त्यावरुन अकलुज पोलीस ठाणे गुरन नंबर ४६/२०२६ बी.एम.एस. कलम ३०९ (४), ३ (५) प्रमाणे नोंद करण्यात आला आहे.

सदरचा गुन्हा अकलुज शहरामध्ये एक सेवानिवृत्त वयस्कर व्यक्तीच्या बाबत घडलेला असल्यामुळे, सोलापुर ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस आधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी, अकलुज पोलीस ठाणे येथील तपास पथकाला, गुन्ह्याच्या संबधाने सुचना दिल्या तसेच तांत्रिक विश्लेषणासाठी निवडणुक बंदोबस्त सारख्या महत्वाचा बंदोबस्त चालु असताना, आपल्या स्तरावर टिम तयार करुन अकलुज पो. ठाणे तपास पथक उपलब्ध करुन दिले. यामुळे सीसीटिव्ही व सायबर तांत्रिक माहितीचे, तांत्रिक विश्लेषण करुन इसम ज्ञानतु शरद मांडवे राहणार मांडवेवस्ती.

श्रीपुर ता. माळशिरस, परमेश्वर नागनाथ लौखडे राहणार यमाईनगर, श्रीपुर ता. माळशिरस, सत्यजित अनिल लोढे राहणार माळीनगर तालुका माळशिरस यांना शिताफीने ताब्यात घेवुन त्यांचेकडे तपास केला असता त्यांनी गुन्हयाची कबुली दिली. त्यांचेकडुन वर नमुद गुन्हयातील चोरी केलेला एक तीन तोळयाचे चैन, एक तीन तोळयाचे ब्रासलेट, एक साडे चार ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी असा अंदाजे ३,२२,५००/-रु किमंतीचे ६.४ तोळे वजानाचे सोन्याचे दागिणे हस्तगत करण्यात आलेले आहे. सदर गुन्हयाचा तपास पोसई कदम करीत आहेत.

सदरची कामगिरी अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, प्रितम यावलकर अपर पोलीस अधीक्षक, संतोष वाळके उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली निरज उबाळे पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम, पोलीस हवालदार सुहास क्षीरसागर, शिवकुमार मदभावी, विक्रम घाटगे, दत्ता खरात, विनोद साठे, रणजित जगताप, पंडीत गयळे, बबलु गाडे सायबर शाखा सोग्राचे सोनकर, मेटकरी यांनी कामगिरी केली आहे.

# मराठा आरक्षण संघर्षयोद्धा जरांगे पाटील आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी आज सोलापूरात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षण आंदोलनाचे प्रमुख नेतृत्व आणि संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील हे बुधवार दिनांक ११ रोजी, सोलापूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या या दौऱ्यानिमित्त सोलापूर शहरात तसेच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मनोज जरांगे पाटील हे मंगळवेढ्याकडे रवाना होण्यापूर्वी सोलापूर शहरातील पुणे नाका येथील छत्रपती संभाजी महाराज चौकात सायंकाळी चार वाजता उपस्थित राहणार असून, त्या ठिकाणी ते मराठा समाजबांधव, कार्यकर्ते व नागरिकांच्या गाठीभेटी घेणार आहेत. या कार्यक्रमासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने माऊली पवार यांनी मराठा बांधवांसह पत्रकार बांधवांनाही मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

यानंतर सोलापूर- मंगळवेढा मार्गावरील माचणूर या गावात मनोज जरांगे पाटील यांचे सायंकाळी पाच वाजता भव्य स्वागत करण्यात येणार आहे. माचणूर येथे ते प्रथम ग्रामदैवताचे दर्शन घेणार असून, त्यानंतर ग्रामस्थ, सोलापूर शहर तसेच जिल्ह्यातील मराठा समाजबांधवांशी संवाद साधणार आहेत. या भेटी दरम्यान मराठा आरक्षण आंदोलनासंदर्भात सद्यस्थिती, पुढील दिशा आणि



समाजाची भूमिका यावर चर्चा होण्याची शक्यता आहे.

मनोज जरांगे पाटील हे पुढे मंगळवेढा येथे होणाऱ्या सुवर्णमहोत्सवी शिवजयंती स्थापनेस उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, मराठा समाजात मोठ्या प्रमाणात उत्साह पाहायला मिळत आहे.

मराठा आरक्षणाच्या लढ्यात सातत्याने आघाडीवर असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या सोलापूर दौऱ्याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून, या दौऱ्यातून मराठा समाजाला नव्या ऊर्जा व दिशा मिळेल, अशी भावना समाजबांधवांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# बौद्ध समाजातील संस्थांना सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना जाहिर

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या व संस्थेमध्ये ५१ टक्के पेक्षा जास्त बौद्ध समाजातील विश्‍वस्त/सदस्यांची संख्या असलेल्या बौद्ध समाजातील सांस्कृतिक,

शैक्षणिक व सामाजिक कार्य राबविणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना सन २०२५-२६ अंतर्गत प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र संस्थांनी सन २०२५-२६ साठीचे परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय (नियोजन शाखा), सोलापूर यांचेकडे दि. २० फेब्रुवारी २०२६ पूर्वी सादर करावेत.

दि. २० फेब्रुवारी २०२६ नंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही, असे जिल्हा नियोजन अधिकारी, सोलापूर तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी, दिलीप पवार यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

## ग्रामपंचायत महादेववाडी, ता.माढा जि.सोलापूर

### टेंडर नोटीस

१५ वा वित्त आयोगातून (ग्रामपंचायत स्तर) खालील कामे करणे आहे वर्षे २०२५/२०२६

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १) | सार्वजनीक स्वच्छता विषयक कामे करणे | ३०,०००/ |
| २) | मागासवर्गीय वस्त्यामध्ये स्वच्छता विषयक कामे करणे | ४४,९६१/ |
| ३) | पाणीपुरवठा व्यवस्थापन करणे व दुरुस्ती करणे | ८४,७८५/ |
| ४) | गावामध्ये सार्वजनीक स्वच्छता विषयक कामे करणे | १,१९,९३५/ |

टीप: १) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि.११/०२/२०२६ स. १०.०० पासून २) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दि.१७/०२/२०२६ सायं ५.०० वा पर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय महादेववाडी ३) निविदा उघडणेचा दि.१८/०२/२०२६ रोजी स. १०.०० वाजता ४) निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५) निविदा मंजूर, नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.सरपंच यांना राखुन ठेवला आहे. निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून मिळतील व स्वीकारले जातील.

सही/- ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत
महादेववाडी, ता.माढा, जि.सोलापूर

शिक्का

सही/- सरपंच
ग्रामपंचायत महादेववाडी,
ता.माढा, जि.सोलापूर

# सांगोल्यात गावगुंडांकडून तलवारीनं मारहाण

## शेकडो कार्यकर्त्यांसह आ. देशमुखांनी केलं आंदोलन



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील 12 जिल्हा परिषद निवडणुकीचे निकाललागले आहेत. या निकालात सांगोला तालुक्यातील कोळा या जिल्हा परिषद गटामध्ये शेतकरी कामगार पक्ष प्रणित सांगोला तालुका विकास आघाडीने मोठा विजय मिळवला आहे. यानंतर कोळा येथील गावगुंड आणि काही सांगलीच्या गुंडांनी गावात तलवारीच्या साह्याने दहशत माजवल्याची घटना घडली आहे. काही जणांवर तलवारीचे वार केल्याने गावात दहशतीचे वातावरण तयार झाले आहे. त्यानंतर शेकापचे आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी तातडीने कोळा इथं येऊन या गावगुंडांवर तातडीने पोलिसांनी कडक कारवाई करण्याची मागणी करत ठिया आंदोलन सुरु केले आहे. जोपर्यंत पोलीस या गावगुंडांवर कारवाई करत नाही तोपर्यंत शेकडो ग्रामस्थांसह आपण सुरु केलेले ठिय्या आंदोलन सोडणार नसल्याचा इशारा आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी दिला आहे. दरम्यान कोळा येथील मुख्य चौकात शेकडोच्या साह्याने ग्रामस्थ एकत्रित येऊन आंदोलन सुरू केले आहे. दिवसांनी वेळीच कारवाई केली असती तर लोकांना असा मार खावा लागला नसता असा संताप ग्रामस्थात आहे.


### 24 तासाच्या आत सांगली आणि कोळा येथील गावगुंडांवर तातडीने कारवाई करा, अन्यथा...

यावेळी आमदार देशमुख यांनी पोलीस प्रशासनाला 24 तासाच्या आत सांगली आणि कोळा येथील गावगुंडांवर तातडीने कारवाई न केल्यास सांगोला पोलीस स्टेशन समोर आमदार बाबासाहेब देशमुख आणि डीवायएसपी ऑफिस समोर त्यांच्या डॉक्टर पत्नी बेमुदत आंदोलन करणार असल्याचा इशारा पोलिसांना दिला आहे. सांगोला तालुक्यातील कोळा येथे शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्ते आणि महिला पुरुष ग्रामस्थांना गाव गुंडांकडून आणि सांगलीच्या गुंडांकडून झालेल्या मारहाणीच्या निषेधार्थ आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांच्या नेतृत्वाखाली बेमुदत आंदोलन सुरू झाले होते. कोळा आणि सांगलीतील गावगुंडांनी तलवारीने गोरगरीब ग्रामस्थांना मारहाण केली आहे. पोलिसांनी कारवाई न केल्याने पोलीस या गुंडांना पाठीशी घालत असल्याचे ग्रामस्थ सांगत असून हा प्रकार गंभीर असल्याचा इशाराही पोलीस प्रशासनाला आमदार देशमुख यांनी दिला आहे. कोळा येथील चौकात आता चार ते पाच हजार ग्रामस्थांचा जमाव जमला असून कोणीही कायदा हातात घेऊ नये असे आवाहन आमदार डॉक्टर देशमुख यांनी केले आहे.

## CHANGE IN NAME

I am changing my name from **SHAIKH HAJI ARIF SAIFANSAB** To **SHAIKH MOHAMMED ARIF SAIPAN MULUK** for passport issuance.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

## सुडोकु - 172


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | 5 | | | | 4 | 3 |
| 4 | 7 | | 1 | | 2 | | 5 | |
| | | | | | | 2 | 9 | 1 |
| 9 | | 3 | 4 | | | 5 | 8 | 6 |
| 6 | | | | | 5 | | 2 | |
| | 5 | | | | | 1 | 7 | |
| 3 | | 5 | 8 | | | 9 | 6 | 2 |
| | 2 | 6 | 3 | | 9 | 8 | | 5 |
| 8 | | | | 5 | | | | |

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

निर्मल व्यसनमुक्ती केंद्र
मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

वर-वधू



जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र
आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

पाहिजेत
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता सिक्युरिटी गार्ड त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# भारत पेट्रोलियमतर्फे इंधन बचावाबाबत 'सक्षम' पंधरवडा




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारत पेट्रोलियमतर्फे तेल, गॅस आदी नैसर्गिक इंधन बचावाबाबत 1 फेब्रुवारी पासून 'सक्षम' पंधरवड्या सुरुवात झाली आहे. या अंतर्गत जनजागृतीपर विविध उपक्रम घेण्यात येत आहेत, अशी माहिती भारत पेट्रोलियम सोलापूर शाखेचे विक्री व्यवस्थापक नीरजकुमार यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

सक्षम 2025-26 (संरक्षण क्षमता (महोत्सव) हा आपल्या देशाच्या ऊर्जा सुरक्षा, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणासाठी भारत सरकारने सुरू केलेला एक महत्त्वाचा राष्ट्रीय कार्यक्रम आहे.या कार्यक्रमाचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे जीवाश्म इंधनावरील वाया जाणारा खर्च रोखणे, परकीय तिजोरीवरील वाढता भार कमी करणे आणि जीवाश्म इंधन जाळण्यामुळे निर्माण होणाऱ्या हरितगृह वायूंच्या प्रतिकूल परिणामांपासून पर्यावरणाचे संरक्षण करणे,

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय आणि तेल उद्योगाचे राज्यस्तरीय समन्वयक संबंधित राज्य सरकारच्या सक्रिय सहभागाने/समर्थनाने जनजागृती पसरविण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतात.

सक्षम (संरक्षण क्षमता महोत्सव) २०२५-२६ हे १ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी या दरम्यान आयोजित केले आहे. याची टॅगलाइन 'कन्सर्व ऑइल अँड गैस, गो ग्रीन" (तेल आणि वायूची बचत करा, पर्यावरणास अनुकूल व्हा) अशी आहे.पंधरवड्याच्या कालावधीत तेल विपणन कंपन्या (ओएमसी) राज्यभरात संवर्धनाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणासाठी वर्तनात्मक बदलांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबवणार आहेत.

या पंधरवड्यात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी गट चर्चा/वादविवाद, महाविद्यालयांमध्ये ग्राफिटी/भिंतीचित्र स्पर्धा, इंधन कार्यक्षम ड्रायव्हिंग स्पर्धा, लेख लेखन, पत्रकार परिषदा आणि टीव्ही/रेडिओवरील टॉक शो असे विविध उपक्रम राबवले जाणार आहेत.

सक्षम मोहिमेदरम्यान ओएमसी, शालेय मुले, तरुण, एलपीजी वापरकर्ते, ड्रायव्हर्स/फ्लीट ऑपरेटर, उद्योग कर्मचारी/कामगार, शेतकरी, निवासी संस्था, ग्रामपंचायती, स्वयंसेवी संस्था इत्यादी विविध मोठ्या वर्गापर्यंत पोहोचणार आहोत. या पत्रकार परिषदेला तिलकराज,सम्राट ब्रजेश, मनस्वी हरे कृष्णा आदी उपस्थित होते.

# काँग्रेसच्या पराभवाची जबाबदारी स्वीकारून नरोटे यांनी राजीनामा द्यावा

## माजी आ. विश्वनाथ चाकोते व माजी महापौर आरिफ शेख यांची मागणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महापालिका निवडणुकीत काँग्रेसच्या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतन नरोटे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी माजी आमदार विश्वनाथ चाकोते तसेच माजी महापौर आरिफ शेख यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत केली.

महापालिका निवडणुकीत सोलापूर शहरातील काँग्रेस व मित्र पक्षांच्या उमेदवारांच्या पराभवास नरोटे हेच कारणीभूत आहेत. या निवडणुकीमध्ये चेतन नरोटे यांच्याकडे प्रभाग क्र. १५-क व १५-ड चे काँग्रेस पक्षाचे बी फॉर्म होते. ऐन छाननीच्या वेळेस त्यांच्या गल्लीत राहणारे भारतीय जनता पार्टीचे उमेदवार विनोद भोसले यांच्या विरोधात प्रभाग क्र. १५-क चे बी फॉर्म दिले व स्वतः नरोटे यांनी प्रभाग क्र. १५-ड मधून भारतीय जनता पार्टीचे उमेदवार व ते बाबा करगुळे यांच्या विरोधात फॉर्म दाखल केले.या निवडणुकीमध्ये पक्षाचा ए.बी. फॉर्म देण्यास प्रभाग क्र. १५ मधील उमेदवारांना उशीर केला व काही अडचणी निर्माण होऊ नये म्हणून ४ ते ५ वकिलांची नेमणूक केली.

संपूर्ण निवडणुकीमध्ये नरोटे यांनी भारतीय जनता पार्टीचे उमेदवार विनोद भोसले दोघांनी मिळून आपल्या भागातील व तसेच संपूर्ण प्रभागातील क्रॉस वोटींगच्या पध्दतीने निवडणुक जिंकली व बाकीच्या सर्व उमेदवारांच्या पराभवास कारणीभूत ठरले, असा आरोप आरिफ शेख यांनी केला.

मनपा निवडणुकीत स्वतः उमेदवार असल्याने नरोटे यांनी काँग्रेस शहराध्यक्ष पद दुसऱ्याला देणे अपेक्षित होते पण त्यांनी तसे केले नाही.चेतन नरोटे यांच्या होम टू होम प्रचाराच्या वेळी त्यांचे नातेवाईक व कार्यकर्ते हे त्यांच्या समाजाची नांवे व मोबाईल नंबरची नोंदणी करीत होते. परंतु मुस्लिम, दलित व ख्रिश्चन समाजाच्या व्यक्तींची कोणतीही माहिती घेत नव्हते. याचा कारण म्हणजेच माज्यामुळे त्यांना सर्व मते मिळतील याची त्यांना खात्री होती. त्यामुळे ते जाणून बुजून आमच्या समाजाला डावलण्याचा त्यांचा प्रयत्न होता हे स्पष्ट दिसून येत आहे, असा आरोप आरिफ शेख यांनी केला.

चेतन नरोटे यांच्यासारखा अध्यक्ष म्हणून कार्यरत असल्यास तर येणाऱ्या काळात याहीपेक्षा भयानक परिस्थिती पक्षाची करतील याचा नेम नाही. तसेच पाडापाडीचे राजकारण करण्याची परंपरा ही चेतन नरोटे यांची पूर्वीपासूनच आहे.

त्यांनी यापूर्वी काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष कै. धर्मा भोसले व कु. हेमा चिंचोळकर यांना देखील पाडण्याचे काम केलेले आहे, असा आरोप यावेळी विश्वनाथ चाकोते व आरिफ शेख यांनी केला. शहरातील काँग्रेस पक्षाचे उमेदवारांच्या पराभवास ते कारणीभूत असल्याने त्यांनी याबाबत आत्मचिंतन करुन त्यांच्यामुळेच हा पराभव झाल्याचा स्वीकार करावा, अशी मागणी काँग्रेसच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांची असल्याचे चाकोते व शेख म्हणाले.

**प्रभाग 15 मधील तीन उमेदवारांचा पराभवाचे कारण**

प्रभाग 15 मधील सर्व मुस्लिम, दलित व ख्रिश्चन या समाजाची मते ही पॅनल टू पॅनल झाली व त्याचा फायदा चेतन नरोटे यांना झाला. परंतु इतर समाजाची मते ही क्रॉस झाली असल्याने चेतन नरोटे हे निवडून आले व प्रभाग क्र. १५ मधील इतर तिन्ही उमेदवारांचा पराभव झाला. नरोटे यांच्यावर काँग्रेसचे शहराध्यक्ष या नात्याने सर्व उमेदवारांना निवडून आणण्याची जबाबदारी असतानादेखील त्यांनी कोणतीही जबाबदारी न स्वीकारता व कोणत्याही उमेदवाराचा प्रचार न करता फक्त आपल्याकरीता ही निवडणूक असल्याचे दाखवून दिले व संपूर्ण काँग्रेस कमिटीला वाऱ्यावर सोडले, असा आरोप विश्वनाथ चाकोते व आरिफ शेख यांनी केला.

# मौलाना आझाद पॉलिटेक्निक येथे Tech - 2k26 तांत्रिक महोत्सव उत्साहात संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील तांत्रिक क्षेत्रात अगदी सुप्रसिद्ध असलेल्या मौलाना जात पॉलीटेक्निक होटगी येथील कॉलेजमध्ये संपन्न झालेल्या तांत्रिक महोत्सवाचे उद्घाटन विश्वविद्या विकास मंडळाचे अध्यक्ष फैज इनामदार यांच्या हस्ते झाले.

सोलापूर जिल्हा दक्षिण तालुका येथील होटगी गावात असलेल्या मौलाना आझाद पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये संपन्न झालेल्या कार्यक्रमात अध्यक्ष अमिरुद्दीन शेख, सचिव नुराशा सय्यद, प्राचार्य सरफराज शेख आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना फेज इनामदार म्हणाले की प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःचे ध्येय निश्चित केले पाहिजे आपली आवड काय आहे आणि आपली क्षमता भविष्यात आपण काय करू इच्छितो याचा विचार करून ठेवावा जेणेकरून भविष्यात आपल्याला ती पर्सनॅलिटी उभी करता येईल. मेहनत आणि सातत्य तसेच आत्मविश्वास त्याच्या बळावर कोणते येत आहे ध्येय साध्य करता येते असे ते म्हणाले.

आपल्या प्रास्ताविक मध्ये सर्फराज शेख बोलताना म्हणाले की तंत्रज्ञान केवळ दैनंदिन जीवन सुलभ करत नाही तर विविध क्षेत्रातील प्रगतीस चालना देते जसे ई-मेल व्हिडिओ कॉलिंग सोशल मीडिया च्या माध्यमातून लोकांशी आपण सहज संपर्क साधू शकतो. ई लर्निंग प्लॅटफॉर्म आणि डिजिटल साउंड साधनांमुळे नवीन संधी निर्माण झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची प्रस्तावना सरफराज शेख यांनी केले तर आभार प्राध्यापक अमरीन यांनी मांडले तसेच सूत्रसंचालन अतिया यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आसमा तांबोळी शिवराज हरवले निखिल दुधगी बसवराज भूषण हर्षद शेख जुनेद शेख तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे विशेष योगदान लाभले.

# पंढरपुरात भाजपा, दोन्ही राष्ट्रवादी पंचायत समितीसाठी समान

## जिल्हा परिषदेसाठी भाजपा ३, दोन्ही राष्ट्रवादी आणि तीर्थक्षेत्र असे मिळून ५ जागा

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील ८ जिल्हा परिषद गटासाठी आणि १६ पंचायत समिती गणासाठी सोमवारी प्रक्रिया पार पडली. पंढरपूर तालुक्यात ८ जिल्हा परिषदेसाठी पार पडलेल्या मतदानामध्ये भाजपा ३ आणि ४ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या घड्याळावर तर १ तीर्थक्षेत्र आघाडीचे व्यंकटराव भालके निवडून आली आहेत तर १६ पंचायत समिती गणासाठी भाजपाचे ८ तर राष्ट्रवादीचे ६, राष्ट्रवादी शरचंद्र पवार १,तीर्थक्षेत्र आघाडी १ उमेदवार निवडून आले आहेत.

यामध्ये करकंब जिल्हा परिषद गटातून आदिनाथ देशमुख भाजपा (विजयी) १४२८५ मते,

बाळासाहेब देशमुख राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी १३१६९ (पराभूत), उंबरे गणातून शहाजी मुळे राष्ट्रवादी (विजयी) ६७१७ मते, माणिक माने राष्ट्रवादी पराभूत ६४७१ मते, करकंब गणातून राहुल परवत भाजपा (विजयी) ७११९ मते, शेळके राष्ट्रवादी ६९७७, भोसे जिल्हा परिषद गटातून शनमुखी भारत कोरके राष्ट्रवादी (विजयी) ११९९४ मते, प्रफुल्लता पाटील भाजपा पराभूत ११५७० मते, भोसे पंचायत समिती गणातून पुनम पवार भाजपा (विजयी)८०३७ मते, गुरसाळे पंचायत समिती गणातून महादेव जाधव पाटील राष्ट्रवादी (विजयी) ४००० मते, राजेंद्र पाटील भाजपा पराभूत २५५० मते, रोपळे अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव असलेल्या जिल्हा परिषद गटातून गीतांजली साळुंखे राष्ट्रवादी (विजयी) ११७३६ मते, ताई वनसाळे भाजपा पराभूत ११२०६ मते, रोपळे पंचायत समिती गणातून विजया भोसले राष्ट्रवादी (विजयी) ६१०२ मते, उषा शेडगे भाजपा पराभूत ५८७७ मते, अनुसूचित महिलांसाठी राखीव असलेल्या सुस्त गणातून सावली गायकवाड राष्ट्रवादी शरदचंद्र पवार (विजयी) ५४६० मते, जोशना फडतरे भाजपा पराभूत ५१८३ मते, गोपाळपूर जिल्हा परिषद गटातून दुर्गा अंकुशराव भाजपा (विजयी) १४८५६ मते, प्रियंका परांडे शिवसेना पराभूत ३४६५, पुळुज पंचायत समिती गणातून ज्योती पांढरे भाजपा (विजयी) ६०४० मते, प्रणाली शेंडगे तीर्थक्षेत्र आघाडी पराभूत ५००५ मते, गोपाळपूर गणातून रंजना शिंदे भाजपा (विजयी) ५७६१ मते, काजल मोरे तीर्थक्षेत्र आघाडी पराभूत ३७६१ मते, वाखरी जिल्हा परिषद गटातून मयुरी बागल राष्ट्रवादी (विजयी) १२३७८ मते, मोनिका काळे भाजपा पराभूत ११४१० मते, वाखरी पंचायत समिती गणातून निखिल गोसावी भाजपा (विजयी) ५५८२, शिवाजी मदने राष्ट्रवादी पराभूत ५१४४, मते, पटवर्धन कुरोली गणातून प्रमिला झांबरे राष्ट्रवादी (विजयी) ६५४० मते, प्रियंका नाईकनवरे भाजपा पराभूत ५८२१ मते, अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव असलेल्या भाळवणी जिल्हा परिषद गटातून सुप्रिया गायकवाड राष्ट्रवादी (विजयी) ११३८२ मते, जयश्री लोखंडे भाजपा पराभूत ११०३६ मते, भाळवणी पंचायत समिती गणातून विजय शिंदे भाजपा (विजयी) ६९६६ मते, संभाजी शिंदे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पराभूत ५०१५, अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव असलेल्या पळशी पंचायत समिती गणातून अक्काबाई लोखंडे राष्ट्रवादी (विजयी) ५२०१ मते, रेखा चंदनशिवे भाजपा पराभूत ५१७३ मते, अनुसूचित जाती राखीव असलेल्या टाकळी जिल्हा परिषद गटातून नंदकुमार वाघमारे भाजपा (विजयी) १११२४ मते, वैभव कांबळे तीर्थक्षेत्र आघाडी पराभूत ६०३९ मते, दीपक चंदनशिवे शिवसेना ३४४५ मते , टाकळी पंचायत समिती गणातून वंदना फाटे भाजपा (विजयी) ३५७४ मते, रोहिणी साठे शिवसेना पराभूत ३००५ मते, खर्डी पंचायत समिती गणनातून शुभम आगवणे भाजपा (विजयी) ६४०२ मते, भाऊसाहेब आगावणे तीर्थक्षेत्र आघाडी पराभूत ४३०६ मते, कासेगाव जिल्हा परिषद गटातून व्यंकटराव भालके तीर्थक्षेत्र आघाडी (विजयी),१०५७१

हरिभाऊ गांधरे भाजपा पराभूत, संजय वाघमारे राष्ट्रवादी शरचंद्र पवार, कासेगाव पंचायत समिती गणातून प्रमोद देशमुख राष्ट्रवादी (विजयी), प्रशांत देशमुख पंढरपूर मंगळवेढा शहर विकास आघाडी पराभूत, दाजीसाहेब देशमुख तीर्थक्षेत्र विकास आघाडी, सरकोली पंचायत समिती गणातून प्रियांका जाधव तीर्थक्षेत्र विकास आघाडी (विजयी),अर्चना कराळे भाजपा, दीपक भोसले राष्ट्रवादी अशी मतमोजणी झाली आहे.

# जनशक्तीसमोर धनशक्ती पराभूत : खा.धैर्यशील मोहिते-पाटील



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक ही जनशक्ती विरुद्ध धनशक्ती अशीच ठरली असून या लढतीत जनतेचा विजय झाला आहे, असे प्रतिपादन खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केले.

९ फेब्रुवारी रोजी जाहीर झालेल्या निकालानुसार भाजपाला जिल्हा परिषद गटात २ व पंचायत समितीत ६ जागा मिळाल्या. तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), आरपीआय, शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (ठाकरे गट) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या महाआघाडीला जिल्हा परिषदेत ७ व पंचायत समितीत १२ जागा मिळाल्या.

या निकालाने पंचायत समितीवर महाआघाडीचे स्पष्ट वर्चस्व सिद्ध झाले आहे. खा. मोहिते-पाटील म्हणाले की, राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, ज्येष्ठ नेते जयसिंह मोहिते-पाटील व आमदार उत्तम जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवनिर्वाचित सदस्य तालुक्याच्या विकासासाठी भरीव काम करतील.

यावेळी नवनिर्वाचित सदस्य अर्जुनसिंह मोहिते-पाटील म्हणाले, 'विजयदादा, बाळदादा, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व आमदार उत्तम जानकर यांच्या विश्वासाला पात्र ठरत हा विजय मिळाला आहे. पंचायत समितीमार्फत जनतेची सर्व कामे पूर्ण ताकदीने केली जातील. विकासासाठी आवश्यक निधी निश्चितपणे आणला जाईल.'

दरम्यान, नवनिर्वाचित उमेदवारांचा अकलूज येथील शिवरत्न बंगल्यावर औक्षण करून सत्कार करण्यात आला.

यावेळी विजयसिंह मोहिते-पाटील, खा. धैर्यशील मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील, शीतलदेवी मोहिते-पाटील व स्वरूपाराणी मोहिते-पाटील उपस्थित होते. कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण व फटाक्यांची आतषबाजी करून आनंद व्यक्त केला.

# महा विस्तार शेतकरी ॲप शेतकऱ्यांपर्यंत कृषीज्ञान पोहचविण्यासाठी एक व्यासपीठः भोसले

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** शेतकऱ्यांपर्यंत अधिकृत, विश्वासार्ह व आधुनिक कृषी ज्ञान पोहोचवण्यासाठी विकसित करण्यात आलेले 'महाविस्तार-AI (MahaVISTAAR-AI) शेतकरी ॲप' हे एक सशक्त डिजिटल व्यासपीठ म्हणून पुढे आले आहे. पीक अवस्था निहाय मार्गदर्शन, स्थानिक हवामानावर आधारित सल्ला, कीड-रोगांचे पीकनिहाय इशारे तसेच एआय-सक्षम चॅटबॉटद्वारे संवाद अशी या ॲपची वैशिष्ट्ये असून, शेतकऱ्यांना अचूक सल्ला मिळण्यास मदत होत आहे.

महिला शेतकऱ्यांचा शेती व संलग्न कामांमधील सहभाग लक्षणीय असूनही, संस्थात्मक व सामाजिक अडथळ्यांमुळे त्यांना अनेकदा औपचारिक व विश्वासार्ह कृषी माहिती उपलब्ध होत नाही. ही बाब लक्षात घेऊन दि. १० ते १४ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राज्यव्यापी विशेष मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या मोहिमेत प्रत्येक गावात जाऊन महिला शेतकऱ्यांना 'महाविस्तार-AI' ॲप डाउनलोड व वापरासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या अनुषंगाने महिला शेतकऱ्यांसाठी विशेष प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमात जमीन मालकी हक्क विचारात न घेता, शेती किंवा संबंधित कृषी कामात गुंतलेली कोणतीही महिला 'शेतकरी' म्हणून ग्रा' धरली जाणार आहे. स्मार्टफोन नसलेल्या महिलांसाठी गट-आधारित प्रशिक्षण व प्रात्यक्षिकांद्वारे सहभाग सुनिश्चित करण्यात येणार आहे.

मोहिमेच्या यशासाठी कृषी ताई, कृषी सखी, पशु सखी, महिला बचत गट (SHGs) व विविध महिला संघटनांचा सक्रिय सहभाग घेतला जाणार आहे. महिला शेतकऱ्यांचा पुरेसा सहभाग मिळावा यासाठी गावपातळीवर आगाऊ प्रचार, पूर्वसूचना तसेच त्यांच्या दैनंदिन जबाबदाऱ्यांनुसार बैठकींच्या वेळा नियोजित केल्या जाणार आहेत. ॲपची वैशिष्ट्ये व चॅटबॉट वापर स्पष्ट करणारे लघु व्हिडिओ तयार करून विविध माध्यमांतून प्रसारित केले जाणार आहेत. तसेच क्षेत्रीय स्तरावर प्रात्यक्षिकांसाठी कृषी, विज्ञान व ग्रामीण विकास पार्श्वभूमी असलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मदत घेतली जाणार आहे.

गुगल प्ले स्टोअरवरून आजच 'महाविस्तार-AI' ॲप डाउनलोड करून शेतीतील डिजिटल क्रांतीचा भाग व्हावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.




# रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत सोलापूरमध्ये पथनाट्याद्वारे जनजागृती

## रोटरी क्लब ऑफ सोलापूर, RTO व करुणाशील संस्थेचा संयुक्त उपक्रम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वाढत्या रस्ते अपघातांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या वतीने सोलापूर फ्ळड विभाग व करुणाशील संस्था यांच्या सहकार्याने 'अपघात' या विषयावर प्रभावी पथनाट्याचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत राबविण्यात आला.

सदर पथनाट्य मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी सोलापूर शहरातील तीन प्रमुख व गजबजलेल्या ठिकाणी सादर करण्यात आले. सकाळी सात रस्ता परिसरात, दुपारी एसटी स्टँड परिसरात आणि दुपारी WIT महाविद्यालय परिसरात पथनाट्य सादर करून विविध वयोगटातील नागरिकांपर्यंत रस्ता सुरक्षेचा महत्त्वाचा संदेश पोहोचवण्यात आला.

पथनाट्यातून दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर, वाहन चालविताना वाहतूक नियमांचे पालन, वेगमर्यादा, मद्यपान करून वाहन चालविण्याचे दुष्परिणाम तसेच अपघातांमुळे होणारी मानवी, आर्थिक व सामाजिक हानी प्रभावीपणे मांडण्यात आली. कलाकारांच्या सशक्त अभिनयामुळे नागरिकांचे लक्ष वेधून घेण्यात यश आले असून, उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनेकांनी वाहतूक नियमांचे पालन करण्याची शपथ घेतली. शहरातील विविध भागांत रस्ता सुरक्षेचा संदेश पोहोचवण्यात हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरल्याचे आयोजकांनी सांगितले.

या उपक्रमाचे आयोजन रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्षा रो. धनश्री केळकर, सचिव रो. निलेश फोफलिया आणि प्रकल्प प्रमुख रो. डॉ. राजीव मोहोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास रो. डॉ. राजीव प्रधान, रो. शांता येळंबकर, रो. पराग कुलकर्णी, रो. आशिष मेहता, रो. सुहास लाहोटी, रो. संदीप जव्हेरी व रो. विशाल वर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती.

करुणाशील संस्थेचे आशुतोष नाटकर व सर्व विद्यार्थी कलाकारांचे विशेष योगदान लाभले. तसेच RTO विभागातील रो. महेश रायबान, मोटार वाहन निरीक्षक विशाल यादव, अजित कदम, सहायक मोटार वाहन निरीक्षक पूनम चव्हाण, चालक राकेश कांबळे व अमोल माने यांनी मोलाचे सहकार्य केले. WIT महाविद्यालयाचे डॉ. नरेंद्र काटीकर व NSS चे डॉ. प्रवीण काथवटे यांचेही विशेष सहकार्य लाभले.

पथनाट्यकार आशुतोष नाटकर तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था प्राचार्य मनोज बिडकर एस. आर.गोलेकर व आयटीआय संस्थेच्या वतीने संस्थेमधील विद्यार्थ्यांनी गेल्या काही दिवसापासून या पथनाट्यद्वारे प्रबोधन करीत आहेत सदरच्या या पथनेट्याची मागणी अजूनही होत आहे.

रस्ता अपघात रोखण्यासाठी जनजागृती हाच प्रभावी मार्ग असून, अशा उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.